बापूजींच्या गोड गोष्टी

साने गुरुजी

बापूजींच्या गोड गोष्टी

भाग दुसरा

■

साने गुरुजी

साधना प्रकाशन

किंमत ५० पैसे

दोन शब्द

बापूजींच्या गोड गोष्टींचे एकूण बारा भाग काढण्याचा गुरुजींचा संकल्प होता. ' गांधी विजय ' हे हरिविजयासारखे एक पुस्तक त्यांनी योजिले होते. परंतु हे संकल्प सिद्ध होण्याची वाट गुरुजींनी पाहिली नाही. जेमतेम सहा भाग तयार झाले आणि गुरुजींनी जीवितयात्रा संपविली. परंतु त्यांनी लिहिलेले हे सहा भाग पुनःपुन्हा मुद्रित होत आहेत. दुसऱ्या भागाची ही नववी आवृत्ती आहे. प्रा. एकनाथ मांजरेकर व यदुनाथ थत्ते यांनी लिहिलेल्या काही गोष्टींचा समावेश गुरुजींनी या भागात केला आहे.

—प्रकाशक

★

नववी आवृत्ती : मार्च १९६९ : © साधना ट्रस्ट

प्रकाशक : प्रभाकर सिद्ध, साधना प्रकाशन, ४३०-४३१ शनिवार पेठ, पुणे २.
मुद्रक : कृ. वि. बोंद्रे, जनवाणी प्रेस, ४५ बुधवार पेठ, पुणे २.

बापूजींच्या गोड गोष्टी

नगर वाचनालय, सातारा.

(पहिल्या भागावरून पुढे सुरू)

SHRI.CHA.PRATAPSINH
MAHARAJ (THORALE)
NAGAR WACHNALAYA, SATARA.
021534

साबरमतीचा आश्रम नुकताच सुरू झाला होता. दाक्षिण आफ्रिकेत सत्याग्रहाचा यशस्वी प्रयोग करून गांधीजी स्वदेशी परतले होते. गुरू नामदार गोखले यांनी सांगितल्याप्रमाणे हिंदुस्थानभर हिंडून साबरमतीच्या तीरावर आश्रम स्थापून ते साधना करीत होते. महात्माजी कधी अहमदाबादच्या बाररूममध्ये जात. चर्चा करीत. सरदार वल्लभभाई पत्ते खेळत बसत. गांधीजींना कोणी फारसे महत्त्व देत नसत. परंतु हळूहळू काही वकील मंडळींना कुतूहल वाटू लागले. गांधीजींजवळ काही काम मागावे असे त्यांना वाटले.

एके दिवशी आश्रमात गांधीजी नि त्यांचे सहकारी काम करीत होते. सारे स्वावलंबन होते. महात्माजी, विनोबाजी एका जात्यावर दळीत. किती थोर अनुभव ! परंतु आज दळणे नव्हते, निवडणे होते. आधी निवडून मग दळावे. गांधीजी, विनोबाजी वगैरे सारे धान्य निवडीत बसले होते.

इतक्यात काही वकील लोक आले, तेथे बसायला शिंदीची चटई घालण्यात आली.

" बसा. " गांधीजी म्हणाले.

" आम्ही बसायला नाही आलो, आम्हांला काही काम द्या. तुमचं काही तरी काम करावं म्हणून आम्ही आलो आहोत. "

" ठीक. आनंदाची गोष्ट आहे. " असे म्हणून दोन तीन ताटांत धान्य घालून बापूजींनी त्या वकील बंधूंसमोर ठेवले.

" हे धान्य निवडा. नीट निवडा. "

" ही ज्वारी बाजरी का आम्ही निवडीत बसू ? "

" हो, आता हेच काम आहे. "

काय करतील बिचारे. ते पोषाखी वकील धान्य निवडीत बसले. नमस्कार करून गेले. पुन्हा काम मागायला ते कधी आले नाहीत. गांधीजींना स्वातंत्र्याचा लढा करणे, अस्पृश्यता जावी म्हणून उपवास करणे, हे जितके महत्त्वाचे वाटे तितकेच डाळ-तांदूळ निवडणेही वाटे. हे बायकांचे तुच्छ काम, असे त्यांनी कधी म्हटले नाही. सेवेचे प्रत्येक कर्म पवित्र आहे. प्रत्येक कर्मात आत्मा ओता. ते नीट करणे म्हणजेच देवाची पूजा, म्हणजेच मोक्ष.

★ ★ ★

१९

महात्माजी म्हणजे धृतव्रत. घेतलेले व्रत त्यांनी कधी सोडले नाही. ते रोज कातीत असत. रोजचे कातणे कधी राहिले नाही. कधी कधी स्वतःचे पेळूही ते तयार करून घेत असत. एके दिवशी त्यांचे कातणे राहिले होते. पेळूही संपले होते.

" आज माझे पेळू मीच तयार करतो. आणा युद्धपिंजण, कापूस छान पिंजतो." राष्ट्राचा तात कापूस पिंजीत बसला. रात्रीची वेळ होती. महात्माजी तुंई तुंई करीत पिंजीत होते. परंतु हवेत आर्द्रता होती. पिंजण्याची तात ओलसर होई. तिला कापूस चिकटून बसे. नीट पिंजता येईना.

मीराबेन जवळच होत्या. मीराबेन म्हणजे सेवामूर्ती. पंच-क्रोशीत औषधे घेऊन हिंडायच्या. झोपडीझोपडीतून जायच्या.

" बापू, नीट नाही पिंजता येत ? "

" कापूस चिटकतो. एक युक्ती आहे."

" कोणती ? "

" निंबाचा पाला चोळून तो तातीवर फिरवला की कापूस चिकटत नाही."

" मी घेऊन येऊ पाला ? "

" हां, आण."

मीराबेन बाहेर गेल्या. त्यांनी निंबाच्या झाडाची एक भली मोठी फांदीच तोडून आणली.

" हा घ्या पाला. फांदीच आणली आहे. भरपूर पाला."

" मूठभर पाला आणायचा तर एवढी फांदी कशाला आणलीस ? आणि इकडे ये. ही बघ पानं कशी झोपल्यासारखी दिसतात नाही ? उगीच तू फांदी आणलीस. जरूरच होती म्हणून मूठभर पाला आणायचा खरं ना ! "

महात्माजी बोलत होते. मीराबेनचे डोळे अश्रूंनी भरले. महात्माजींचे झाडामाडांवरील, त्या पानांवरील प्रेम पाहून मीराबेन यांना एक नवीन दर्शन घडले. भारतीयांच्या आध्यात्मिक वृत्ती-वरच ते भाष्य होते. आत्मा सर्वत्र बघायला शिकावे यावरील ते मूक प्रवचन होते. महात्माजी प्रेमसिंधू होते.

★ ★ ★

२०

महात्माजी स्वच्छतेचे परम भोक्ते. स्वच्छता म्हणजे प्रभूचे रूप. आपल्या देशातील जनतेला स्वच्छता म्हणजे परमात्मा हे अजून शिकायचे आहे. घरात आपण स्वच्छता ठेवू. परंतु सार्वजनिक स्वच्छतेची जाणीव आपणास अद्याप यावयाची

आहे. गांधीजींचे सारे जीवनच अंतर्बाह्य शुची आणि निर्मळ. त्यांचा लहानसाच पंचा, परंतु तो किती स्वच्छ असे.

त्या वेळेस महात्माजी येरवड्याच्या तुरुंगात होते. त्यांनी मुद्दाम काम मागून घेतले होते. ते कपडे शिवीत.महात्माजी म्हणजे थोर कर्मयोगी. एके दिवशी जेलचे मुख्य अधिकारी त्यांच्याकडे आले. बूट घालून ते अधिकारी गांधीजी जेथे बसत, सूत कातीत, तेथपर्यंत आले. अधिकाऱ्यांनी चौकशी केली. प्रसन्न मुखाने, विनोदाने बापूंनी उत्तरे दिली. थोड्या वेळाने अधिकारी निघून गेले. तेव्हा मग गांधीजी उठले. त्यांनी बादली भरून आणली. सुपरिंटेंडेंट बूट घालून जेथे आले होते तेथील जागा त्यांनी पाण्याने धुवून काढली, सारवली, स्वच्छ केली.

" गांधीजी, हे काय ? " कोणी विचारले.

" ही तर माझी बसण्या-उठण्याची जागा. ती स्वच्छ नको ठेवायला ? "

" कोणी अस्वच्छ केली ? "

" सुपरिंटेंडेंट इथं आले होते. आज ते बोलत इथपर्यंत आले. पायांतील बूट इथपर्यंत आले. म्हणून स्वच्छता करीत आहे. "

" त्यांना तुम्ही सांगितलंत का नाही ? इथं एक पाटी लावू का, की पादत्राणं काढून पुढं यावं म्हणून ? "

" नको. ज्याच्या त्याच्या लक्षात हे यायला हवं. परंतु जाऊ

दे. बऱ्याच दिवसांनी आज सारवलं. अशी संधी मला कोण मिळू देतो ? सुपरिंटेंडेंटसाहेबांचे आभारच मानायला हवेत की, अशी सुंदर करमणूक त्यांनी मला दिली, स्वच्छतेची सेवा हातून घडली. ”

असे बोलून बापूंनी हसत हसत हात धुतले.

★ ★ ★

२१

महापुरुषांची शक्ती आश्चर्यकारक असते. त्यांच्या हास्यात, त्यांच्या अश्रूत, त्यांच्या गोड वाणीत अपार शक्ती असते. प्रांजळपणात त्यांचा पराक्रम असतो. स्वामी रामतीर्थांचे मंद स्मित अपार परिणामकारक असे म्हणून सांगतात. एकदा एक बुद्धिवादी गृहस्थ रामतीर्थांकडे वादविवादासाठी म्हणून गेला. परंतु रामतीर्थांचे मधुर हास्य पाहून, वाद करणे विसरून प्रणाम करून तो निघून गेला. महात्माजींच्या जवळही अशी जादू होती.

एकदा राष्ट्रसभेच्या कार्यकारिणीची बैठक होती. देशबंधू दास कार्यकारिणीचे सभासद होते. ते एका मित्राजवळ म्हणाले : “ आज महात्माजींजवळ मी चांगलीच चर्चा करणार आहे. सारे मुद्दे काढून ठेवले आहेत. बघू या गांधीजी काय उत्तर देतात. ” कार्यकारिणीची बैठक सुरू झाली. महात्माजी हसतमुख

असे आले. सर्वांनी अभिनंदन केले. कामास आरंभ झाला. महात्माजींनी आपले निवेदन मांडले. अत्यंत निर्मळपणे, प्रामाणिकपणे मांडलेले ते निवेदन ऐकून सारे जिंकले गेले.

" कोणाला काही शंका आहे ? " बापूजींनी विचारले.

" सारे निःशंक आहोत. " सभासद म्हणाले.

" ठीक तर मग. मी जातो. " असे म्हणून गांधीजी सर्वांना प्रणाम करून हास्यमुखाने निघून गेले.

" तुम्ही गांधीजींजवळ चर्चा करणार होता ना ? मग गप्प का बसलात ? " देशबंधूंना कोणी विचारले.

" मी काय सांगू ? नेहमी असंच होतं. मारे ठरवून यावं, परंतु गांधीजींच्या प्रत्येक शब्दातील कळकळ जिंकून घेते. आमचा बुद्धिवाद हतप्रभ ठरतो, निर्जीव ठरतो. शेवटी हृदय चर्चाप्रिय बुद्धीला जिंकून घेतं. " देशबंधू म्हणाले.

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

★ ★ ★

२२

ते असहकाराचे दिवस होते. महात्माजी ज्वालायमान झाले होते. परदेशी कापडाच्या होळ्या करीत ते चालले होते. ' सरकारी शाळा-महाशाळांवर बहिष्कार घाला ' सांगत होते.

(साने गुरुजी)

रवींद्रनाथांना महात्माजींच्या या चळवळीत द्वेषाचा वास आला. त्यांनी तसे लिहिले. महात्माजींनी लिहिले, "परकी सरकारविषयी द्वेष पसरविणं हा तर माझा धर्म आहे. परंतु ही अप्रीती, हा द्वेष व्यक्तींकडे वळतो. सरकारी अधिकाऱ्यांचे मग खून पडतात. मी द्वेषाला व्यक्तींकडून वस्तूंकडे वळवीत आहे. परकी सरकारचे अधिकारी मारू नका. हे परकी कापड जाळा. असं सांगून व्यक्तीवर घसरणारी हिंसा मी वस्तूंकडे वळवितो."

रवीन्द्रनाथांनी लिहिले, "राष्ट्र आता कुठं जागं होत आहे. अशा वेळेस का द्वेषबुद्धीची गाणी शिकवणार? सकाळी पक्षी गोड गातात, मधुर गीत गात उंच आकाशात उडतात. आपण उंच न जाता क्षुद्र गोष्टीतच, वाईट गोष्टीतच रमणार का?" महात्माजींनी उत्तर दिले, "सकाळी उठून पक्षी गात गात उंच उडतो हे खरं. परंतु आदल्या दिवशी त्याचं पोट भरलेलं असतं. आदल्या दिवशी तो उपाशी असता तर गोड गीत गात उंच उड्डाण करता ना." MGC-48/29438/32/

रवीन्द्रनाथ म्हणाले, "पाश्चिमात्य शिक्षणावर बहिष्कार का घालता! राममोहन राय, लोकमान्य टिळक, इत्यादी थोर पुरुष म्हणजे या पाश्चिमात्य विद्येच्याच देणग्या नाहीत का?"

महात्माजी म्हणाले, "परकी भाषेतून शिक्षण घ्यावं न लागतं तर राममोहन राय, लोकमान्य हे आणखी मोठे झाले असते. परकी शिक्षणानंही त्यांची मूळची बुद्धी मेली नाही. कारण ती अनन्त होती. कबीर, तुलसीदास, अशी रत्नं पूर्वी का लाभली

नाहींत ? परकी शिक्षणानं राष्ट्राचं अपार नुकसान झालं आहे. राष्ट्राचा आत्मा मारला आहे. लोकमान्यादिकांचा मूळचा अंकुरच जोरदार म्हणून तो टिकला."

* * *

२३

१९३३–३४ मधील ते दिवस. अस्पृश्यता–निवारणासाठी महात्माजींनी केलेला उपवास होऊन गेला होता. उपवासानंतर महात्माजींनी हिंदुस्थानभर दौरा काढला. अस्पृश्यता दूर करा, मंदिरे, घरेदारे मोकळी करा, असे महापुरुष सांगत होता. थोर पुरुष धर्माला पुन्हा निर्मळ रूप देत असतात. महात्माजी त्या वेळेस त्या प्रश्नाशी जणू तन्मय होऊन गेले होते. अस्पृश्य बंधूंस त्यांनी ‘ हरिजन ’ असे नाव दिले. जणू देवाचे लोक, प्रभूचे आवडते, असे ते म्हणू लागले. कारण, ज्याला माणसे दूर ठेवतात त्याला प्रभू जवळ करीत असतो.

त्या वेळेस महात्माजींना अमुक मंदिर उघडले, अमुक विहीर मोकळी झाली, अशी स्वप्ने पडत. वास्तविक त्यांची झोप गाढ असे, परंतु ध्यानी-मनी अस्पृश्यता-निवारण त्यांना दिसत होते. एकच ध्यास त्यांना लागला होता.

दौरा काढता काढता ते ओरिसा प्रांतात आले. याच प्रांतात

सप्तपुरींतील ती पवित्र जगन्नाथपुरी. हिंदुस्थानातून येथे यात्रेकरू येतात. नऊ हंड्यांतील भात प्रसाद म्हणून नेतात. जगन्नाथाचा प्रसिद्ध रथ कोणास माहीत नाही? मोक्ष मिळावा म्हणून या रथाखाली पडून चिरडून मेलेले किती तरी श्रद्धावान होऊन गेले. जगन्नाथपुरीचा समुद्र अति सुंदर आहे. निळा निळा गंभीर सागर. येथेच बंगालमधील थोर भक्त चैतन्य समुद्र पाहून जणू देहभान विसरले. तो निळानिळा समुद्र पाहून कृष्ण भगवानच समोर आहे असे वाटून चैतन्य सागरात शिरू लागले. अशा जगन्नाथपुरीला महात्माजी आले.

महात्माजींनी अस्पृश्यता-निवारणाचा पुढील संदेश दिला : "धर्म सर्वांना जोडतो. आपल्याच भावाबहिणींस दूर ठेवलंत तर प्रभूही दूर राहील. कोणास कमी मानू नका. सारी प्रभूची लेकरं. भेदाभेद करणं पाप आहे. अस्पृश्यता ठेवाल तर खरा धर्मही नाही, स्वराज्यही नाही."

महात्माजींच्या बरोबर कस्तुरबा होत्या, महादेवभाई होते. सायंकाळची सभा झाली. प्रार्थना झाली. महात्माजी विसावा घेत होते. कस्तुरबांना जगन्नाथाचे दर्शन घेण्याची इच्छा झाली.

"महादेव, तू येतोस बरोबर? चल, आपण प्रभूचं दर्शन घेऊन येऊ. ते पवित्र मंदिर पाहून येऊ." कस्तुरबा म्हणाल्या.

महादेवभाई कस्तुरबांबरोबर गेले. दोघे मंदिरात गेली. कस्तुरबा प्रभूसमोर उभ्या राहिल्या. दोघे परतली. महात्माजींस कळले की, महादेव आणि कस्तुरबा मंदिरात गेली आहेत.

महात्माजी बेचैन झाले. त्यांना काही सुचेना. हृदय धडधडू लागले. ते अति अस्वस्थ झाले.

इतक्यात कस्तुरबा आल्या, महादेवभाई आले, "तुम्ही देवळात कशा गेलात? मी स्वतःला हरिजन–अस्पृश्य–समजत असतो. जेथे हरिजनांना मज्जाव, तेथे आपण कसं जायचं? इतरांना मी क्षमा केली असती; परंतु तुम्ही तर माझ्याशी एकरूप झालेली माणसं. तुम्ही त्या मंदिरात जाऊन आलात. जिथं हरिजन जाऊ शकत नाहीत तिथं गेलात. छेः, मी हे कसं सहन करू? माझी वेदना कोणास सांगू? तुम्ही मंदिरात गेला म्हणजे मीच गेल्यासारखं आहे. कारण, माझ्याजवळच्या माणसांच्या वर्तनावरूनच माझीही परीक्षा केली जाणार!" महात्माजींना बोलवेना. छातीचे ठोके वेगाने पडत होते. नाडी अति जलद चालू लागली. महादेवभाई कष्टी झाले. महात्माजींचे प्राण जणू कंठी आले. एवढा घोर परिणाम होईल, असे कस्तुरबा व महादेवभाई यांना वाटले नव्हते. परंतु आता काय? डॉक्टरांची धावपळ सुरू झाली. कस्तुरबा प्रार्थना करीत बसल्या. महादेवभाई मुके होते.

हळूहळू महात्माजींचे मन शांत झाले. नाडी ठीक झाली. हृदयाची धडधड कमी झाली. पुढे ते शांत पडून राहिले. अनर्थ टळला. जीवदान मिळाले. महादेवभाईंनी लिहिले: "संतांची सेवा करणे, त्यांच्याजवळ राहणे हे अति कठीण आहे. केव्हा काय होईल याचा नेम नसतो."

महात्माजी काही बाबतींत भावनाप्रधान होते.

★ ★ ★

नगर

२४

महात्माजी अखंड कर्मयोगी होते. त्यांचा क्षणन् क्षण सेवेत जाई. देशासाठी असा सतत झिजणारा महात्मा झाला नाही. परंतु महात्माजींची कर्मात आसक्ती नसे. कर्म ते आपल्या डोक्यावर बसू देत नसत. कर्मासाठी अट्टाहास नसे.

त्या वेळेस बोरसद तालुक्यात प्लेग झाला होता. सरदार आणि त्यांचे सहकारी सेवक बोरसदमध्ये धावले. स्वच्छतेची मोहीम सुरू झाली. उंदीर मारणे सुरू झाले. परंतु अहिंसेचा आधार घेऊन लोक उंदीर मारायला तयार होत ना. सरदारांनी महात्माजींस लिहिले, " उंदीर मारायला सांगा. नाही तर लोक मरू लागतील. " महात्माजींनी लिहिले, " माझ्याइतकाच लहानशा घुंगुरट्यालाही जगायचा हक्क आहे. परंतु मानवी जीवन अपूर्ण आहे. डास होऊच देऊ नयेत. उंदीर घरात येणार नाहीत असं करावं. मी काय सांगू ? उंदीर मारायला हवेत. "

महात्माजी लिहूनच थांबले नाहीत. ते स्वतः बोरसदच्या शिबिरात येऊन दाखल झाले. उंदीर मारण्याच्या मोहिमेला जोर चढला. प्लेग हटू लागला. कधी कधी महात्माजी सरदार वगैरेंबरोबर फिरायला जात. एकदा हसत सरदारांना म्हणाले, " माझी तुमची भेट नसती झाली तर कुठं वाहवत गेला असता, आ ? " असे दिवस जात होते.

नालय, सातारा.

एके दिवशी सरदारादी सारे सकाळी कामाला जायला निघाले. महात्माजी म्हणाले, " तुम्ही सारे चाललात. मला काम द्या."

" तुम्ही इथं आशीर्वाद द्यायला असा. हेच तुमचं काम."

" नुसता बसून काय करू ? मला एक खुळखुळा तरी आणून द्या. मी तो वाजवीत बसेन." सारे हसले आणि निघून गेले. कामाचे डोंगर उचलणारे बापू गंमतीने खुळखुळा वाजवायलाही तयार होते; अशी त्यांची बालवृत्ती होती.

★ ★ ★

२५

मीराबेन आज हिमालयाच्या उतरणीवर एका खेड्यात गोशाळा चालवीत आहेत. गायीबैलांच्या शेणमुताचा शेतीसाठी नीट उपयोग करीत आहेत. एका आरमारी अधिकाऱ्याच्या त्या कन्या. हिंदी जनतेच्या सेवेला वाहून घेण्याचे ठरवून त्या भारतात आल्या. महात्माजींच्या जीवनतत्त्वज्ञानाच्या त्या निस्सीम उपासक बनल्या. त्या साधक वृत्तीच्या आहेत. विवेकानंदांच्या जशा भगिनी निवेदिता, त्याप्रमाणे महात्मा गांधींच्या मीराबेन.

सेवाग्रामला आल्यावर मीराबेन जणू भिक्षुणी बनल्या

व्रतस्थ बनल्या. त्या आजूबाजूच्या पंचक्रोशीत औषधे घेऊन हिंडत. सेवा त्यांचा धर्म बनला. मीराबेन चांगल्याच शिकलेल्या आहेत. त्यांना फ्रेंच चांगले येते. महात्माजींचे चिटणीस महादेवभाई, त्यांना फ्रेंच शिकायची इच्छा होती. मीराबेनजवळ थोडा वेळ काढून ते फ्रेंच शिकू लागले. परंतु पुढे ती गोष्ट महात्माजींना कळली. एके दिवशी बापू नि महादेवभाई दोघे बसले होते. बोलता बोलता महात्माजी म्हणाले,

" महादेव, हल्ली तू म्हणे फ्रेंच शिकतो आहेस ? कोण शिकवतं ? "

" मीराबेन शिकवतात. "

" शिकायला वेळ कोठून काढलास तू ? माझ्या कामात अळंटळं करीत असशील. आणि हे बघ, मीराबेन स्वदेश, स्वगृह सोडून या देशात आली. तिला तू हिंदी शिकव. तिच्यापासून घेण्याऐवजी तिला नवीन काही दे. खरं ना ? "

" होय बापू. " महादेवभाई म्हणाले.

★ ★ ★

२६

महात्माजींनी स्वदेशीचा अर्थ व्यापक केला. वंगभंगाच्या वेळेस स्वदेशीचा मंत्र जन्मला. महाराष्ट्रात सार्वजनिककाकांनी

ह्याच्याआधी पंचवीस तीस वर्षे त्याचा घोष केला होता. मँचेस्टरच्या कपड्यापेक्षा येथील गिरणीचे कापड वापरणे म्हणजे स्वदेशी. परंतु येथील गिरण्यांच्या कपड्यापेक्षाही खेड्यातील लोकांनी बनविलेली खादी वापरणे अधिक स्वदेशी, शंभर टक्के स्वदेशी, असे गांधीजींनी सांगितले. ज्यामुळे खेड्यांतील जनतेच्याच हातात अधिक पैसा पडेल ते अधिक स्वदेशी. देशी साखर खाणे चांगले. परंतु गूळ खाऊन खेड्यात अधिक पैसा रहात असेल तर गूळ खाणे अधिक स्वदेशी. महात्माजींनी स्वदेशीत अधिक अर्थ ओतला. शब्दांचे अर्थ युगानुयुगे वाढत असतात. आपण प्रथम स्वातंत्र्य असे म्हणत असू. स्वातंत्र्य म्हणजे परकी सत्ता जाणे असे समजत असू. परंतु तेवढा अर्थ पुरेसा नाही. स्वातंत्र्य म्हणजे पिळवणूक नाहीशी होणे, गरिबांचे संसार सुखाचे होणे, एवढा अर्थ त्यात आता आला आहे.

त्या वेळेस महात्माजी मला वाटते बार्डोली तालुक्यात होते. त्यांच्या दर्शनाला हजारो स्त्रीपुरुष येत, पावन होऊन जात. एके दिवशी महात्माजींना कोणी तरी भेट आणली. कोणी आणली ती भेट? एका ताटावर आच्छादन होते. एका भगिनीने महात्माजींसमोर ते ताट ठेवले. काय होते त्या ताटात? ते ताट रुपयांनी भरलेले होते. रुपयांनी भरलेली ती थाळी महात्माजींसमोर ठेवून त्या भगिनीने प्रणाम केला. भक्तिभावाने ती उभी राहिली.

महात्माजींनी क्षणभर त्या भगिनीकडे पाहिले. नंतर गंभीरपणे

म्हणाले, " माझ्यासमोर तू अशी उघडी काय आलीस, तुला काही वाटत नाही ? " सारे चकित झाले. त्या भगिनीने कोठे वस्त्र फाटलेले नाही ना वगैरे पाहिले. ती तर नवीन सुंदर वस्त्र नेसून आली होती. कोणाच्या लक्षात अर्थ येईना. महात्माजी म्हणाले, " माझ्या म्हणण्याचा अर्थही तुमच्या लक्षात येत नाही. आपली सर्वांचीच बुद्धी जणू जड झाली आहे. ही भगिनी उघडी आहे, म्हणजे अंगावर वस्त्र नाही असा अर्थ नव्हे. परंतु हे विलायती वस्त्र आहे. तुमची अब्रू विलायती व्यापाऱ्यांनी झाकायची. उद्या तिकडून कपडा आला नाही की तुमची अब्रू कशी झाकली जाणार ? परावलंबी लोक उघडे आहेत. म्हणून ज्याने त्याने स्वतःच्या हातच्या सुताची खादी वापरावी. आपली अब्रू आपल्या हाती ठेवावी. जो आपली अब्रू दुसऱ्याच्या हाती देतो तो फजीत होतो."

महात्माजींच्या बोलण्यातील गंभीर भाव लक्षात येऊन सारे खाली मान घालून उभे राहिले. आपण त्या शब्दांतील गंभीरता कधीही विसरता कामा नये. अन्नवस्त्राच्या बाबतीत, व्यक्ती-निदान तो तो प्रादेशिक घटक स्वयंपूर्ण बनविले पाहिजेत. नाही तर दुरून अन्न नाही आले, उपासमार; दुरून कपडा नाही आला, उघडे राहणे,–अशी आपत्ती येईल.

★ ★ ★

२७

जगातील सारे थोर पुरुष साधेपणाने राहणारे होते; त्यांना कोणतेही काम करताना कंटाळा वाटत नसे. भगवान गोपालकृष्ण गाई चारी, घोडे हाकी, उष्टी काढी. महंमद पैगंबर उंट चारीत, स्वतःचे कपडे शिवीत, गोठ्यात जाऊन दूध काढीत, मशीद झाडीत. परंतु महात्मे सेवेचे कोणतेही काम कमी मानत नसत. एवढेच नव्हे तर ते खेळही खेळत. गोपालकृष्ण गोपाळांबरोबर खेळे. कृष्ण भगवानाने खेळांना दिव्यता दिली आहे. त्याचा पेंद्या अमर आहे. महंमद पैगंबरही मुलांत रमायचे, खेळायचे, गोष्टी करायचे. येशू ख्रिस्तही मुलांवर प्रेम करी.

महात्माजींचेही मुलांवर अपार प्रेम. दक्षिण आफ्रिकेत त्या वेळेस महात्माजी राहत होते. साधी राहणी होती. सारे स्वावलंबन. सकाळी सहा वाजताच उठून दळायला लागत. दिवसा लागणारे पीठ घरातील पुरुषमंडळी दळून देत. दहापंधरा मिनिटे दळण्याचे काम चाले. पुरेसे मिळे. दळताना गाणी, विनोद, हसणे चाले. दळताना व्यायामही होई आणि आनंदही मिळे. जात्याच्या आवाजात हसण्याचा आवाज मिसळे. गंमत असे. पाणी भरणे, केर काढणे, संडास साफ करणे, भांडी घासणे,—सारे काम घरीच असे. शरीराला व्यायाम होई. काम स्वच्छ होई.

परंतु मला एक गंमत सांगायची आहे. महात्माजी फिरण्याचा रोज व्यायाम घेत हे सर्वांना माहीत आहे. मी सांगणार आहे ती गोष्ट आहे तुम्हांला माहीत ? महात्माजी दळू लागत, संडास साफ करीत. परंतु ते निराळा एक गमतीदार व्यायाम घेत. ओळखा. जोर काढीत ? नाही. बैठका काढीत ? नाही. आसने करीत ? नाही. तर मग कोणता व्यायाम ते घेत ? ओळखलात ? महात्माजी दोरीवरच्या उड्या मारण्यात मोठे तरबेज होते. सकाळी महात्माजी दोरी हातात घेऊन उड्या मारीत. हसणे फारसे ऐकू येत नसे. परंतु दळताना, दोरी हातात घेऊन उड्या मारताना हशा पिके. मौज-गंमत वाटे. जगाला अहिंसेचा संदेश देणारा महात्मा, भारताला स्वातंत्र्य देणारा महात्मा, तो राष्ट्रपिता-दक्षिण आफ्रिकेत सकाळी दोरी घेऊन उड्या मारी ! चित्रकाराने महात्माजींचे हे चित्र काढावे. गंमत वाटेल, नाही ? गोपालकृष्ण गोकुळात चेंडू लगोऱ्या खेळले. महात्माजी दोरीच्या उड्या मारीत.

★ ★ ★

२८

आपला देश गरीब आहे. कोणतीही उपयुक्त वस्तू येथे फुकट दवडणे म्हणजे राष्ट्राची हानी आहे. त्यातून खाण्या-

पिण्याच्या वस्तू फुकट दवडणे म्हणजे तर पाप होय. जुनी माणसे एखादा तांदूळ, डाळीचा कण रस्त्यात पडलेला दिसला तरी उचलीत असत.

ते १९३० मधील दिवस. महात्माजींची ती ऐतिहासिक दांडीयात्रा सुरू झाली होती. ८० सत्याग्रही बरोबर घेऊन सत्याग्रहाचा संदेश देत महापुरुष पायी निघाला होता. समुद्र-काठी दांडी येथे जाऊन महात्माजी सत्याग्रह करणार होते. मीठ हातात घेऊन रावणी राज्य समुद्रात बुडवितो म्हणणार होते. महात्माजींचे ते पायी प्रयाण म्हणजे एक महान राष्ट्रीय यात्रा होती. हजारो लोक त्या ठिकाणी जमत. महात्माजींचा संदेश ऐकत. देशी-विदेशी वार्ताहरांची गर्दी असे. ते पुण्यदर्शन होते.

ते उन्हाळ्याचे दिवस होते. नदीच्या पात्रात टरबुजे-खरबुजे इत्यादी फळे तयार होण्याचे ते दिवस होते. एका मुक्कामी जनतेने गाड्या भरभरून ती उन्हाळी फळे आणली होती. खाईना तो भिकारी. महात्माजींच्या बरोबरचे लोक खाऊन खाऊन किती खाणार? ती फळे तेथे फुकट जात होती. कोणी अर्धवट खाऊन फेकून देत होते. त्या सुंदर रसाळ फळांचा असा नाश होत होता.

आणि महात्माजींनी ते दृश्य पाहिले. ती नासाडी पाहून त्यांना दुःख झाले. ते गंभीर झाले. त्यांच्या भाषणाची वेळ झाली. हजारो स्त्रीपुरुष बापूंची पुण्यवाणी, स्वातंत्र्याची अमर हाक कानी यावी म्हणून तेथे जमलेले होते. महात्माजी

आसनावर बसले. आज ते काय बरे सांगत आहेत ? ऐका. " मी हिंदुस्थानच्या व्हॉइसरॉयला पत्र लिहिलं की, जनतेचं उत्पन्न रोज सरासरीनं दोन आणे असता तुम्ही रोज सातशे रुपये पगार घेणं बरोबर नाही. जनता एका रुपयात आठ जणांचं पोट भरणार. तुमच्या सातशे रुपयांत पाच-सहा हजार लोकांचं पोट भरेल. म्हणजे तुम्ही पाच-सहा हजार लोकांचं अन्न खाता. मी व्हॉइसरॉय साहेबांस देशाचं दारिद्र्य कळविलं. त्यांच्या उधळपट्टीवर मी टीका केली. परंतु आज इथं काय पाहिलं ? शेकडो फळांची मी नासाडी पाहिली. माझ्या बरोबरच्या मित्रांसाठी फळं आणावयाची होती तर थोडी आणावयाची. परंतु गाड्याच्या गाड्या भरून तुम्ही आणलीत. मी व्हॉइसरॉयांना कोणत्या तोंडानं नावं ठेवू ? अशी उधळपट्टी करणं पाप आहे, आणि माझी मान तर तुम्ही खाली केली आहे. देशात एकीकडे उपासमार आहे. अर्धपोटी लोक आहेत. आणि इथं माझ्या स्वातंत्र्ययात्रेत अशी नासाडी होत आहे. माझी वेदना मी कशी प्रकट करू ? पुन्हा असं पाप करू नका. "

त्या व्याख्यानाच्या वेळेस सारे श्रोते खाली मान घालून ऐकत होते. अनेकांच्या डोळ्यांत पाणी आले. महात्माजींच्या ऐकेका शब्दात त्यांचा दुःखी आत्मा जणू ओतलेला होता. त्या दिवशीचे ते भाषण ज्यांनी ऐकले ते ते कधीही विसरणार नाहीत. ती अमर अशी उद्बाधक वाणी होती.

★ ★ ★

२९

१९३१ मधील ती गोष्ट. ३० सालचा स्वातंत्र्याचा लढा यशस्वी झाला होता. महात्माजी आणि व्हॉइसरॉय यांच्या वाटाघाटी होऊन सारे सत्याग्रही मुक्त झाले होते. दिल्लीचा जो गांधी-आयर्विन करार झाला, त्याच्यावर शिक्कामोर्तब करण्यासाठी कराचीला काँग्रेसचे अधिवेशन मार्चच्या शेवटच्या आठवड्यात भरणार होते. परंतु या अधिवेशनावर काळी छाया पसरली होती. अधिवेशन भरण्याच्या एक-दोन दिवस आधी सरदार भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांना फाशी देण्यात आले होते. सरकार आणि काँग्रेस यांच्यामध्ये सलोखा निर्माण होण्याच्या वेळेस त्या थोर तरुण देशभक्तांना फाशी देणे दुष्टपणाचे होते. कराची काँग्रेसमध्ये दुफळी माजावी असाही सरकारी हेतू असेल. फाशीची ही शिक्षा रद्द करावी म्हणून महात्माजींनी फारसे प्रयत्न केले नाहीत, अशी सीमाप्रांतातील लाल डगलेवाल्या खुदाई खिदमतगारांची – देवाच्या सेवकांची समजूत झाली होती. अर्थात् ती चुकीची होती. महात्माजींनी शक्य ते सारे केले होते. तरीही नवजवान प्रक्षुब्ध झाले होते.

महात्माजी कराची काँग्रेसला जात होते. वाटेत लाल डगलेवाल्यांनी त्यांना काळी फुले दिली. निषेधाची चिन्हे होती. पुढे ते कराचीस पोचले. अधिवेशनास सुरुवात झाली. त्या दिवशी महात्माजींनी शांतपणे ती स्वीकारली आणि जपून ठेवली.

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

रात्री एक प्रचंड सभा ठेवण्यात आली होती. त्या सभेत महात्माजी बोलणार होते. नवजवान, लाल डगलेवाले, यांच्या प्रक्षुब्ध जमावासमोर ते बोलणार होते. तुम्ही सभेला जाऊ नका, जमाव खवळलेला आहे असे महात्माजींना परोपरीने सांगण्यात आले. ते म्हणाले, " म्हणूनच मला गेलं पाहिजे. माझ्यावरच त्यांचा राग आहे. तो शांत करायला मीच गेलं पाहिजे. "

आणि हा महापुरुष धीरगंभीरपणे निघाला. ती लहान परंतु आत्मशक्तीने महान अशी मूर्ती उंच व्यासपीठावर चढली. समोर प्रक्षुब्ध तरुण राष्ट्र होते. क्षणभर सारे शांत होते. महात्माजींनी शांत दृष्टीने सभोवती पाहिले आणि ती अमर वाणी, प्रांजळ वाणी सुरू झाली. शेवटी ते म्हणाले, " माझी ही मूठभर हाडं तुम्ही सहज चिरडून टाकाल. परंतु ज्या तत्त्वासाठी मी उभा आहे, ज्या तत्त्वाचा मी उपासक आहे, ती कोण चिरडू शकेल ? ती शाश्वत सत्ये आहेत. " सभा मोडायला आलेले प्रणाम करून स्फुंदत निघून गेले. राष्ट्रपिता शांतपणे शिबिरात आला.

★ ★ ★

नगर वाचनालय, सातारा.

३०

महात्माजींचे जीवन प्रार्थनामय होते. ते हवेशिवाय जगू शकले असते, परंतु प्रार्थनेशिवाय जगू शकते ना. प्रार्थना त्यांच्या जीवनाचा आधार होता. ईश्वरावर त्यांची श्रद्धा होती. साक्षात्कार झाल्याची भाषा ते कधी बोलले नाहीत, परंतु तुम्ही समोर आहात हे जितके सत्य, तितकेच ईश्वर आहे हेही सत्य आहे. मला त्याचा भास होतो, त्या अनंत सत्याचे कधी अंधुक दर्शन होते, असे ते म्हणत. MGC-8८/२१५३८/३२/

त्या वेळेस महात्माजी आफ्रिकेत होते. जीवनाची साधना सुरू झाली होती. हिंदुस्थानातील भावी जीवनाचा संपूर्ण पाया आफ्रिकेत घातला जात होता आणि सत्याग्रह सुरू झाला होता. भारतीय जनता निर्धाराने उभी होती. आफ्रिकेतील भारतीय नरनारी नव-इतिहास निर्मीत होती. शान्त-दान्त महात्माजी दिव्य मार्गदर्शन करीत होते.

आज जरा गंभीर घटना होती. जनरल स्मट्स तर पोलादी मनुष्य. गांधीजींची चळवळ हाणून पाडण्यासाठी तो उत्सुक; परंतु काय असेल ते असो, आत्मशक्तीचा त्याच्यावरही प्रभाव पडत होता. गांधीजींना त्यांच्याकडून बोलावणे आले होते. जोहान्सबर्गला जाण्यासाठी गांधीजी निघाले. स्टेशनवर पोलक आणि त्यांची पत्नी दोघे आली होती. महात्माजी आणि

पोलक गंभीरपणे बोलत होते, परंतु बोलणे थांबले. यश येईल की अपयश ?

पोलकांची पत्नी सचिंत होती. गांधीजींसाठी आपण काय बरे करावे असे तिच्या मनात राहून राहून येई.

" बापू, भाई – " तिने हाक मारली. त्या काळी गांधीजींना बापूपेक्षा भाई या नावानेच संबोधीत. पोलक हे छोटे भाई, तर गांधीजी बडे भाई.

" काय विचारायचं आहे ? अशी तू सचिंत का ? " गांधीजींनी विचारले.

" तुमच्यासाठी मी काय करू ? तुम्ही तर वाटाघाटीसाठी जात आहात. मन खाली-वर होत आहे. मी काय करू ? "

" प्रार्थना कर. अंतःकरणपूर्वक प्रार्थना कर. याहून अधिक करण्यासारखं दुसरं काय आहे ? " गांधीजी शांतपणे म्हणाले.

* * *

३१

१९३१ मधील ते दिवस. तीस सालचा महान सत्याग्रह थांबला होता. पंडित मोतीलाल नेहरू नुकतेच निजधामास गेले होते. जवाहरलालजींना धीर देऊन गांधीजी पुन्हा दिल्लीला आले. साऱ्या राष्ट्राचा बोजा त्यांच्या शिरावर होता. त्यांना दुःख करीत बसायला वेळ नव्हता.

स्वातंत्र्याचा लढा करून राष्ट्र नवतेजाने तळपत होते. परंतु वाटाघाटी व्हावयाच्या होत्या. शेवटच्या अटी ठरायच्या होत्या. विदेशी मालावर निरोधन करण्याचा हक्क, नैसर्गिक मीठ गोळा करण्याचा वा स्वतःपुरते तयार करण्याचा हक्क, इतरही काही प्रश्न यांवर व्हॉइसरॉय आयर्विन नि गांधीजी यांच्यात बोलणी चालू होती. दुसऱ्याही कृष्णछाया होत्या. सरदार भगतसिंग आणि त्यांचे शूर सहकारी यांना फाशीची शिक्षा सांगण्यात आली होती. त्याही बाबतीत गांधीजी शक्य ते करीत होते. साऱ्या राष्ट्राचा संसार त्यांना चालवायचा.

महात्माजींना त्या वेळेस अठरा अठरा तास काम पडे. एके दिवशी तर बावीस तास काम पडले. व्हॉइसरॉयबरोबर रात्री बारा बारा वाजेपर्यंत बोलणी चालत. एके रात्री बारानंतर महात्माजी घरी परत आले. दोन वाजायला आले होते. तो राष्ट्रपिता आल्यावर झोपी गेला का ? ते थकलेले शरीर अंथरुणावर पडले का ? नाही. घरी आल्यावर चरखा घेऊन ते कातीत बसले. कारण रोजचे कातणे राहिले होते. कातणे म्हणजे त्यांची कर्मपूजा. चरक्याला ते देव म्हणत. कारण चरका गरिबाला अन्न देतो. चरक्यावरचा धागा त्यांना दरिद्री नारायणाशी जोडी, गरिबांच्या श्रमजीवनाशी जोडी. रात्री दमून भागून आल्यावरही दोन वाजता चरक्यावर कातीत बसणारी बापूंची मूर्ती डोळ्यांसमोर येऊन हात जोडले जातात.

★ ★ ★

३२

१९३० मधील गोष्ट. सत्याग्रहाचा लढा, मिठाचा सत्याग्रह अजून सुरू झाला नव्हता. परंतु महात्मा गांधी ८० सत्याग्रहींच्या तुकडीनिशी साबरमतीच्या आश्रमातून बाहेर पडले होते. मी सत्याग्रह केल्याशिवाय कोणी करू नये अशी त्यांची आज्ञा होती. महात्माजींची ती दांडीची यात्रा सुरू झाली. देशभर तेजाचे झोत जात होते. महात्माजींची वाणी देशभर जात होती, साता-समुद्रापलीकडे जात होती. देशभर देशभक्तीच्या लाटा उसळत होत्या.

महात्माजींचा एके ठिकाणी आज मुक्काम होता. सायंकाळी विराट सभा झाली. महापुरुषाची वाणी ऐकून लोक पावन झाले. संस्फूर्त झाले. सभा संपली. महात्माजींची प्रार्थना झाली. सत्याग्रहींची भोजने झाली. महात्माजींचे आंथरूण पसरण्यात आले. गच्चीत आकाशाखाली महापुरुष झोपला होता. महात्माजींची झोप म्हणजे योगी पुरुषाची ती झोप. ती गाढ झोप होती.

रात्रीचे दोन-तीन वाजण्याची वेळ होती. बाहेर स्वच्छ चांदणे होते. महात्माजींच्या तपाप्रमाणे ते शांत होते, सुंदर होते. महात्माजी उठले. त्यांना बरीचशी पत्रे लिहावयाची होती. ते हळूच उठले. कंदील जवळ होता. त्याची वात मोठी करून ते लिहावयाला बसले.

परंतु कंदिलातील तेल संपले. प्रकाश मंद होऊ लागला. वातच जळू लागली. शेवटी कंदील विझला. आता काय करणार ? स्वयंसेवक, सत्याग्रही दमून भागून झोपले होते. महात्माजींनी त्यांना उठवले नाही. ते तेथेच चंद्राच्या मंदमधुर प्रकाशात लिहू लागले.

कोणी तरी उठले. महात्माजी लिहीत आहेत असे पाहून ते गृहस्थ बापूंजवळ आले.

" बापू, चंद्राच्या प्रकाशात लिहायला दिसतं का ? डोळ्यांना त्रास नाही का होत ? तुम्ही कोणाला उठवलं का नाही ? आणि या लोकांनी कंदिलात तेल नको होतं का नीट भरून ठेवायला ? " ते गृहस्थ रागाने बोलू लागले.

" मला चांदण्यात लिहायला दिसतं आहे. वाचायला मात्र दिसत नाही. निजू दे त्या सर्वांना. सारे दमलेले आहेत. तुम्हीही शान्तपणं जरा पडा. अजून बरीच रात्र आहे. " गांधीजी शान्तपणे म्हणाले.

स्वयंसेवकांना न उठवता चांदण्यात पत्रे लिहिणारी, राष्ट्रपित्याची ती प्रेमस्नेहमयी मूर्ती डोळ्यांसमोर येऊन माझे अंतःकरण उचंबळून येत असते.

★ ★ ★

३३

त्या वेळेस महात्माजी दक्षिण आफ्रिकेत होते. फिनिक्स नावाचे मोठे शेत घेऊन तेथे त्यांनी वसाहत सुरू केली होती. सर्वांनी श्रमाची दीक्षा घेतली होती. महात्माजी पहाटे उठत. ते दळीत, पाणी भरीत, जोडे शिवीत, सुतारकाम करीत. शिवाय इतर कामे. सर्वांची देखभालही तेच करीत.

आश्रमात एका आश्रमीयाची मुलगी फार आजारी होती. गांधीजी तिला जवळ घ्यायचे. ती त्यांना चिकटून बसायची. दिवसभर तर त्यांना वेळ होत नसे.

सायंकाळ झाली. अंधाराच्या छाया पसरू लागल्या. अनंत आकाशाखाली आश्रमवासी मंडळी प्रार्थनेला जमली. ते पहा बापू आले. मांडी घालून बसले. परंतु त्यांच्या मांडीवर काय आहे ते ? ती लहान आजारी मुलगी. थकून भागून आलेले बापू त्या मुलीला खांद्याशी घेऊन हिंडवीत होते. ती त्यांना बिलगली होती, आणि प्रार्थनेची घंटा झाली. ती उठेल म्हणून तिला तशीच जवळ धरून बापू आले. प्रेमाने हलकेच त्यांनी तिला मांडीवर ठेवले. ती लहानगी झोपली होती. प्रार्थना सुरू झाली. गांधीजींच्या मांडीवर लहान मुलगी आणि गांधीजी विश्वमातेशी एकरूप ! अनंत आकाशाखाली मांडीवर आजारी मुलगी घेऊन प्रार्थना करणारे बापू ! किती हृदयस्पर्शी दृश्य !

★ ★ ★

३४

१९१९-२० मधील ते तेजस्वी दिवस. गांधीजी देशभर विजेसारखे संचरत होते. आसाममधील दौरा सुरू झाला. आसाममध्ये दळणवळणाची फार गैरसोय. सर्वत्र प्रचंड नद्या. उंच पर्वत, खोल दरीखोरी. गाड्या फारशा नाहीत. एकदा एक गेली तर दुसरी केव्हा येईल नेम नाही. एकदा तर मालगाडीच्या डब्यातून जावे लागले.

रात्रीची वेळ होती. गांधीजींना एका डब्यात बसवण्यात आले होते. त्या छोट्या डब्यात ते एकटेच होते. रात्रभर विसावा मिळावा ही इच्छा. परंतु गार्डाचे मागचे डबे सुटले नि रुळावर तसेच राहिले. पुढची गाडी पुढे गेली. गार्ड मध्ये होता. त्याच्या लक्षात बऱ्याच अंतरावर आले की, मागचे काही डबे सुटून गेले आहेत. गाडी थांबली. गांधीजींचा डबा कोठे आहे ? तो मागे राहिला ! कार्यकर्ते चिंतातुर झाले. पाठीमागून एखादी गाडी आली तर ? गाडी हळूहळू मागे नेण्यात येऊ लागली. कार्यकर्ते डब्याच्या फळ्यांवर उभे होते. गांधीजींच्या डब्यावर एकदम गाडी जाऊन आदळू नये म्हणून दक्षता. आणि गांधीजींचा डबा दिसला. गांधीजी जागे झाले होते. स्मितमुखाने बसले होते.

"बापू, केवढी आपत्ती आली होती," मित्र म्हणाले.

" पाठीमागून गाडी आली असती ! निसर्गाच्या मांडीवर जाऊन कदाचित पडलो असतो, गंमत." बापू मुक्त हास्य करीत म्हणाले.

नगर वाचनालय, सातारा.

★ ★ ★

३५

बापूंच्या करुण मरणाआधीची एक गोष्ट. मीराबेन दिल्लीला आल्या होत्या.

" बापू, तुम्ही हृषिकेशला या ना एकदा? माझ्यासाठी नव्हे, परंतु तुमच्या आवडत्या गायींसाठी. कशा सुंदर गायी आहेत. "

" मी आता मृतवत आहे. कशाला मला बोलावतेस ? " असे बापू बोलले. " देशभर जातीय रक्तपात. मी सांगत आहे, परंतु माझे कोण ऐकतो ? " मी एकटा आहे असे बापूंना वाटे. या कत्तली बघण्यापेक्षा मरण बरे असे का त्यांना वाटे ? परंतु मीराबेनची करुण, दुःखी मुद्रा पाहून बापू पुन्हा गंभीरपणे म्हणाले :

" मी मेल्यावर तुम्हा सर्वांशी अधिकच एकरूप होईन, देहाचा बंध गळेल, आत्मा मुक्त होईल. सर्वांशी मिळून जाईन. खरं ना ? "

MGC-४८/२९५३४/३२/

★ ★ ★

नगर वाचनालय, सातारा. २

साधना

मराठी साप्ताहिक

संस्थापक : साने गुरुजी

- शाळा-महाविद्यालयांतील विद्यार्थी, सार्वजनिक वाचनालये आणि सुसंस्कृत अभ्यासू नागरिक यांच्यासाठी उपयुक्त असे साप्ताहिक.
- साने गुरुजी पहिल्या निवेदनात म्हणतात : "महाराष्ट्रात उदार विचार सर्वत्र नेण्यासाठी साधना आहे. समाजवादी तिची दृष्टी आहे. जेथे जेथे चांगला विचार दिसतो तेथून साधना घेते. नवयुगाला अनुरूप अशी विचारसंपदा देणारी साधना आहे."
- प्रचलित जागतिक घडामोडींची सर्वांगीण माहिती.
- विधायक कार्याचा परिचय.
- थोर व्यक्तींचे परिचय.
- समाजाच्या अज्ञात आधारांची ओळख.
- आंतर भारती.
- साहित्यपरिचय.
- समाजोन्नतीच्या विविध धडपडी.
- प्रचलित आंदोलने.
- मुलांच्या मेळाव्यात इ. इ.

वार्षिक वर्गणी १८ रुपये

सहामाही वर्गणी १० रुपये

४३०-३१ शनिवार पेठ, पुणे २